
दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक २८३ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.७ जानेवारी २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## राज्यात आज ३६ हजार २६५ रुग्णांची नोंद

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात कोरोना रुग्णसंख्ये झपाट्यानं वाढत असून आज दिवसभरात तब्बल ३६ हजार २६५ नव्या रुग्णांची नोंद करण्यात आली आहे. आजच्या रुग्णवाढीसह राज्यातील सक्रिय रुग्णांचा आकडा आता १ लाख १४ हजार ८४७ इतका झाला आहे.



राज्यात गेल्या २४ तासांत ३६,२६५ नवे रुग्ण आढळून आले आहेत. तर १३ जणांच्या मृत्यूची नोंद झाली आहे. ८,९०७ रुग्णांनी आज कोरोनावर यशस्वीरित्या मात केली आहे. राज्यातील ओमायक्रॉनच्या रुग्णांचा आकडा देखील वाढताना दिसत आहे. राज्यात आज ७९ नवे ओमायक्रॉनचे रुग्ण आढळून आले आहेत. यासह ओमायक्रॉनच्या एकूण रुग्णांचा आकडा ८७६ इतका झाला आहे. तर बरं झालेल्या रुग्णांचा आकडा ३८१ इतका झाला आहे.

# पनवेल तालुका पत्रकार महासंघातर्फे केला जागतिक किर्तीच्या विजेत्यांचा सन्मान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**मराठी भाषेतील आद्य पत्रकार, दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्मदिन (६ जानेवारी) देशभरात पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. यावर्षी पनवेल तालुका पत्रकार महासंघातर्फे पत्रकार दिनाचे औचित्य साधून अपंगत्वावर यशस्वीरीत्या मात केलेल्या जागतिक किर्तीच्या विजेत्यांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता.**





नवीन पनवेल येथील के.आ. बांठीया विद्यालयाच्या सभागृहात पनवेल महापालिकेचे विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे, जेष्ठ सल्लागार प्रमोद वालेकर, के.आ. बांठीया विद्यालयाचे प्राचार्य भगवान माळी, सुधागड एज्युकेशन सोसायटीचे प्रशासकीय अधिकारी मिलिंद जोशी, पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे अध्यक्ष रत्नाकर पाटील यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना महापालिकेचे विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे म्हणाले की, कुटुंब प्रमुख चांगला असला की घर चांगले असते, त्याप्रमाणे या पत्रकार महासंघाचे कुटुंब चांगले आहे. या संघाला सुनील पोतदार व प्रमोद वालेकर यांच्या सारख्या ज्येष्ठ पत्रकारांचे पाठबळ आहे, त्यामुळे हे कुटुंब तोडायचा कोणीही प्रयत्न करू शकणार नाही आणि होणार ही नाही, असे प्रतिपादन पनवेल महापालिकेचे विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे यांनी उपस्थितांना संबोधित करताना व्यक्त केले.

यावेळी त्यांनी पत्रकार महासंघाचे अध्यक्ष रत्नाकर पाटील यांच्या कार्याचे कौतुक करताना म्हणाले की, नेहमी निमंत्रण पत्रिकेत अध्यक्षांचे नाव वर असते, पण या पत्रिकेत ज्येष्ठांचे नाव वरती लिहिले गेले आहे, याचेच कौतुक करून प्रीतम म्हात्रे यांनी यातूनच ज्येष्ठांना मान द्यायचे आपण शिकलो पाहिजे असे सांगून कोरोनाच्या काळात काळजी घेणे आवश्यक असले तरी असेही कार्यक्रम होणे गरजेचे असते. आज पत्रकार महासंघाने आमच्या सारख्यांचा सत्कार केला, त्याचबरोबर ज्या त्रिमूर्तीचा सत्कार करून त्यांना पुढे आणले, त्यामुळे नायक सिनेमाची आठवण झाली असल्याचे त्यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, समाजात काहीजण बोलतात पत्रकार हे पैशासाठी काम करत असतात, पण त्यांना हे कळत नाही की, त्यांच्या बातम्यांमुळे कोणाच्या चोऱ्या पकडल्या जातात, कोणाच्या आयुष्याचे भले होते, हे कधी कोणाला कळत नाही. ज्यावेळी आपण घरात सण साजरे करीत असतो त्यावेळी पोलिस आपले रक्षण करीत असतात, त्याप्रमाणे पत्रकारही सणासुदीला कोठेतरी बातमी कव्हरेज करीत किवा फोटो काढत असतात. त्यामुळेच त्या दोघांमध्ये कोठे तरी साम्य असल्याचे दिसते. यावेळी त्यांनी आपल्या सोबत मुंबईत घडलेला किस्सा सांगून आपल्या हस्ते आज सन्माननीय पत्रकारांचा सत्कार होणे हे माझे भाग्य असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

यावेळी के.आ.बांठीया विद्यालयाचे प्राचार्य भगवान माळी म्हणाले की, मोठ्या वर्तमानपत्रात प्रत्येक पानावर काय हे ठरलेले असते. पण आता बातम्यांची पध्दत बदलली आहे. इलेक्ट्रॉनिक्सचा जमाना आला आहे. जगाच्या कानाकोपऱ्यातील बातम्या काही सेकंदात लाईव्ह आपल्या मोबाईलमध्ये पहाता येतात. त्यावेळी प्रश्न पडतो हे एवढ्या कानाकोपर्यात कसे पोहचतात, यावर विश्वास बसत नाही. म्हणूनच पत्रकार बंधूंना लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हटले गेले आहे. ते पुढे म्हणाले, पत्रकारांनी ज्याप्रमाणे आज तीन असामान्यांचा सत्कार केला, हे वाखाणण्याजोगे आहे, आजकाल सेलिब्रेटी आणि राजकारण्यांच्या बातम्या त्वरित घेतल्या जातात, पण त्या देतानाही तळागाळातल्या माणसाच्या ही कौतुकाच्या बातम्या छापून त्यांना प्रोत्साहन द्या, असे भावनिक आवाहन प्राचार्य भगवान माळी यांनी केले.

**यावेळी शॉर्टेस्ट बॉडी बिल्डर स्पर्धेत रायगड भूषण, अलिबाग भूषण, भारत श्री यासारख्या विविध स्पर्धांमध्ये दैदिप्यमान यश मिळवून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झालेल्या प्रतिक विठ्ठल मोहिते यांचा तसेच अलिबाग झिराड श्री, पुणे ज्युनिअर महाराष्ट्र श्री, पनवेल महापौर श्री, भारत श्री, दिव्यांग भूषण, वीर जिजामाता पुरस्कार सन्मानित कनकेश्वर पांडुरंग रसाळ तर स्वमग्नतेवर मात करून ३० पेक्षा अधिक शिष्यवृत्ती संपादन करून १० वी इयत्तेत ९१% गुण, किशोर वैज्ञानिक प्रोत्साहन योजना परिक्षेत अपंगांमध्ये देशात पहिला, गणित विषयात मास्टर पदवी असे नेत्रदिपक यश संपादन करून गणित विषयात पी.एच.डी. करण्याचा मानस असलेल्या जतिन सुरेश पाटील यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.**

सोहळ्याचे प्रास्ताविक करताना पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे अध्यक्ष रत्नाकर पाटील यांनी महासंघातर्फे मागील एक वर्षात कोरोनाचा कालखंड असतानाही वृक्षारोपण, आदिवासी बांधवांना अन्नधान्य वाटप, कुष्ट रुग्ण बांधवांना खाऊचे वाटप, कर्तृत्ववान महिलांचा सन्मान, पत्रकारांसाठी आरोग्य शिबीर यासारखे अनेक सामाजिक उपक्रम यशस्वीरित्या राबविले असल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी आवर्जून आपल्या सहकारी पत्रकार बांधवांनी केलेल्या सहकार्यामुळेच हे शक्य झाल्याचे सांगितले असून कार्यक्रम यशस्वी झाल्याचे समाधान व्यक्त केले.

यावेळी पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे ज्येष्ठ सल्लागार तथा दैनिक किल्ले रायगडचे संपादक प्रमोद वालेकर, पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे अध्यक्ष तथा रायगड शिव सम्राटचे संपादक रत्नाकर पाटील, उपाध्यक्ष तथा दैनिक पुढारीचे प्रतिनिधी दीपक घोसाळकर, दैनिक लोकमतचे प्रतिनिधी तथा सचिव मयूर तांबडे, आर्या प्रहरचे संपादक तथा खजिनदार सुधीर पाटील, दैनिक रामप्रहरचे प्रतिनिधी तथा प्रसिद्धीप्रमुख नितीन देशमुख, दैनिक मुंबई चौफरचे प्रतिनिधी अरविंद पोतदार, दैनिक सामनाचे प्रतिनिधी संजय कदम, रायगड शिव सम्राटचे प्रतिनिधी सुभाष वाघपंजे, दैनिक सकाळचे प्रतिनिधी के. सी.सिंग, दैनिक कृषिवलचे प्रतिनिधी राजेश डांगळे, दैनिक किल्ले रायगडचे प्रतिनिधी प्रदिप वालेकर, दैनिक रायगड नगरीचे संपादक राकेश पितळे, पनवेल वैभवचे संपादक अनिल कुरघोडे, वतन कर्नाळाचे प्रतिनिधी चंद्रशेखर भोपी, दैनिक पुढारीचे प्रतिनिधी राज भंडारी, जनसभाचे संपादक अप्पासाहेब मगर, लोकशाही न्यूजच्या प्रतिनिधी आकांशा देशमुख, आवाज टूडेचे प्रतिनिधी कुणाल जेटपाल, प्रा. बापू महाजन, पॉवर लिफ्टींग कोच अरुण पाटकर, सृष्टी कॉम्प्युटरचे संचालक अक्षय वर्तक, रिया कुलये, गार्डन हेल्थ क्लबचे मोतीराम ठाकूर, अनिल रावराणे, शशिकांत पवार, खुटले गुरुजी, पी.बी. पाटील, प्रदिप शिंदे, के. एन.पाटील, दत्तात्रेय पैलकर यांच्यासह शालेय शिक्षक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त...

### मनसेप्रमुख राज ठाकरे यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी



**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) प्रमुख राज ठाकरे यांच्याविरोधात बीडमधील परळी न्यायालयाने अटक वॉरंट जारी केले आहे. २००८ साली राज ठाकरे यांच्या समर्थनार्थ परळीत मनसेच्या कार्यकर्त्यांनी परिवहन महामंडळाच्या बसेसवर दगडफेक केली होती. याप्रकरणात गुन्हा दाखल होऊन हे प्रकरण न्यायालयात गेले होते. यानंतर राज ठाकरे यांना अनेकदा न्यायालयात उपस्थित राहण्यास सांगण्यात आले होते. परंतु, राज ठाकरे एकाही सुनावणीला हजर राहिले नव्हते. जामीन देऊनही सतत तारखेला गैरहजर राहिल्याने अजामीनपात्र वॉरंट जारी केले आहे. त्यामुळे आता राज ठाकरे काय भूमिका घेणार, हे पाहावे लागेल.

दरम्यान, राज ठाकरे यांच्या मुंबईतील 'शिवतीर्थ' या निवासस्थानी करोनाचा शिरकाव झाला आहे. 'शिवतीर्थ'वरील चार कर्मचाऱ्यांना करोनाची लागण झाल्याचे स्पष्ट झाले होते. त्यामुळे राज ठाकरे यांनी आपल्या पुढील १० दिवसांतील कार्यक्रम आणि बैठका रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे आता राज ठाकरे न्यायालयाकडून सुनावणीला उपस्थित राहण्यासाठी वेळ मागून घेणार का आणखी काही कायदेशीर मार्ग काढणार, याकडे साऱ्यांच्या नजरा लागल्या आहेत.

## मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि शासन आदिवासी बांधवांच्या सदैव पाठीशी : डॉ.नीलम गोऱ्हे



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, शासन आणि संपूर्ण प्रशासन आदिवासी समाजाच्या कायम पाठीशी असून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वजण सर्वतोपरी प्रयत्नशील आहेत, असे प्रतिपादन विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी आज दूरदृश्यप्रणालीद्वारे केले.


जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या पुढाकारातून कातकरी उत्थान अभियानांतर्गत आदिवासी कातकरी समाजातील बांधवांना वन हक्क दस्तऐवज वाटपाचा कार्यक्रम कोविड नियमांचे पालन करीत आज दि.०६ जानेवारी २०२२ रोजी पेण नगरपरिषद सभागृह येथे संपन्न झाला, त्यावेळी त्या दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून बोलत होत्या.

यावेळी रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री कु. आदिती तटकरे, रायगड जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर हे दूरदृश्यप्रणालीद्वारे तर आमदार श्री.रवी पाटील, अलिबाग उप वनसंरक्षक आशिष ठाकरे, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी अरुण पवार, साकव संस्था पेण चे संचालक अरुण शिवकर, प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार, तहसिलदार स्वप्नाली डोईफोडे तसेच आदिवासी कातकरी समाजातील बांधव कोविड नियमांचे पालन करीत प्रत्यक्ष उपस्थित होते.

उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे पुढे म्हणाल्या, वन हक्क कायदा मंजूर झाल्यानंतर १५ वर्षांनी आजचा हा वन हक्कांचे दस्तऐवज वाटपाचा दिवस आला आहे. त्याकरिता जिल्हा प्रशासनाचे अभिनंदन. आजच्या या दस्तऐवज वाटपाच्या कार्यक्रमामुळे आदिवासी बांधवांना त्यांची १४ हजार हेक्टर जमीन परत मिळत आहे. अशा प्रकारचा कार्यक्रम इतर जिल्ह्यातही राबविण्याबाबत पुढाकार घेण्यात येईल. राज्याचे मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि संपूर्ण प्रशासन आदिवासी समाजाच्या कायम पाठीशी राहणार आहे. आजचा हा कार्यक्रम मी नक्कीच मुख्यमंत्री श्री.उध्दव ठाकरे यांच्यापर्यंत पोहोचविणार आहे. तसेच आजचा कार्यक्रम जरी ऑनलाईन माध्यमातून झाला असला तरी कोविडचा जोर ओसरल्यावर आपणा सर्वांची प्रत्यक्ष भेट घेण्यासाठी निश्चित येईन.

यावेळी पालकमंत्री कु.आदिती तटकरे यादेखील दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होत्या. त्या म्हणाल्या, आजचा दिवस ...⁄२

## रहाटाड खाडीत अनधिकृत वाळू उपसा ; स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष




**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यातील रहाटाड खाडीत अनधिकृतपणे वाळू उपसा सुरू असून हजारो रु. महसूल बुडीत आहे. शासनाने वाळू उपशाला बंदी असूनही याखाडीपट्टयात हे अनधिकृत वाळू उपसाला वरदहस्त असल्याचे बोलले जात आहे. सदरची वाळू अँपे टेम्पो, टेम्पो, ट्रँक्टर ट्रकने राजरोसपणे वाळूआणली जात आहे. सदर वाळू रात्रीस खेळ चालतो तर छोटी वाहने राजरोसपणे दिवसा ढवळ्या खाली होत आहेत तालुक्यात नगरपंचायत व ग्रामपंचायत निवडणूकीत प्रशासन व्यस्त असल्याचा फायदा घेऊन उपसा करीत आहेत. महसूल विभागाचे दुर्लक्ष केले असल्याचे समोर आले आहे. तसेच इतरही अनधिकृत धंदे फॉर्म मध्ये असल्याचे विदारक चित्र पहायला मिळत आहे. याबाबत प्रशासन निद्रिस्त भुमिका घेतली असल्याचे दिसून येते आहे. त्यामुळे वाळू माफियाचे चांगलेच फावले आहे. याबाबत जिल्हा प्रशासन लक्ष घालून वाळू माफीयांवर कठोर कारवाई करण्याची मागणी स्थानिक पातळीवर केली जात आहे.

## कार्ला येथील श्री एकविरा देवी मंदिरात १० जानेवारीला महाआरतीचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पेण**

आगरी-कोळी समाजाची कुलस्वामिनी कार्ला निवासिनी आई एकविरा देवी मंदिर व परिसर अनेक दशकांपासून विकास कामांपासून तसेच एकविरा भक्त-भाविकांच्या सुख सुविधांपासून वंचित राहिले आहे. या व इतर अनेक मागण्यांकरिता शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आगरी-कोळी समाज व समस्त एकविरा भक्त-भाविकांच्यावतीने कार्ला लोणावळा येथील श्री एकविरा देवी मंदिरात सोमवार १० जानेवारी रोजी सकाळी ११:३० वाजता देवीच्या महाआरतीचे आयोजन केल्याची माहिती जयेंद्र खुने यांनी दिली आहे.



श्री एकविरा गड व कार्ला लेणी परिसराला वैभव प्राप्त व्हावे तसेच पर्यटन व्यवसायाला त्वरित प्राधान्य मिळावे, मंदिराच्या मूळ बांधकामाविषयी तसेच पुरातत्व अस्तित्वासंदर्भात त्वरित सर्व पुरावे गोळा करून त्या पुराव्यांच्या आधारे नव्याने मंदिराची निर्मिती लवकरात लवकर करण्यात यावी या व इतर अनेक मागण्यांकरिता ...⁄२

## तळोजा मध्यवर्ती कारागृहातील कैद्यांसाठी कोविड लसीकरण शिबिर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या सूचनेनुसार तळोजा मध्यवर्ती कारागृहातील कैद्यांकरिता दि.०६ जानेवारी २०२२ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, पनवेल महानगरपालिका व तळोजा मध्यवर्ती कारागृह प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने कोविड लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



या शिबिरात कारागृहात नवीन दाखल झालेल्या कैद्यांना कोविड लसीचा पहिला डोस देण्यात आला. तळोजा मध्यवर्ती कारागृहातील दाखल २ हजार ८१८ बंद्यापैकी २ हजार ८१६ बंद्यांना कोविड लसीचा पहिला डोस देण्यात आला आहे. तर यापूर्वीच २ हजार १८० कैद्यांना कोविड लसीचे दोन्ही डोस देण्यात आले आहेत, अशी माहिती तळोजा मध्यवर्ती कारागृह प्रशासनाने दिली आहे. यावेळी तळोजा मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक यु.टी.पवार, पनवेल तहसिलदार विजय तळेकर तसेच पनवेल महानगरपालिकेचे लसीकरण वैद्यकीय पथक उपस्थित होते.

## निधी अभावी रखडलेली नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्याची प्रितम म्हात्रे यांची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

निधी अभावी उरण तालुक्यातील रखडलेले फुंडे येथील मंजूर उपजिल्हा रुग्णालय आणि फुंडे, मातवली, पिरकोन, आवरे, वशेणी येथील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्याची मागणी प्रितम म्हात्रे यांनी आदिती तटकरे, पालकमंत्री, रायगड जिल्हा यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



उरण तालुक्यात कित्येक वर्षांपासून आरोग्य सेवेपासून येथील नागरिक वंचित आहेत. सर्प दंश आणि अपघात झाल्यास येथील नागरिकांना नवी मुंबई अथवा पनवेल गाठावे लागते. हे अंतर दूर असल्याने कैक नागरिकांचे उपचार अभावी आपले प्राण गमवावे लागले आहेत. उरण तालुक्यामधील फुंडे येथे उपजिल्हा रुग्णालयाकरीता भूखंड आरक्षित करण्यात आला आहे. त्यानुसार फुंडे, मातवली, पिरकोन, आवरे, वशेनी येथे उपकेंद्र मंजूर आहेत. परंतु निधीअभावी हे केंद्र अद्याप उभारण्यात आले नाहीत. त्यामुळे आपण तातडीने निधी उपलब्ध करून आरोग्य सेवेचा प्रश्न मार्गी लावावा असे प्रितम जनार्दन म्हात्रे, विरोधी पक्ष नेते यानी निवेदनाद्वारे आदिती ताई तटकरे, पालकमंत्री, रायगड जिल्हा कळविले आहे.

# मातोश्रींचा अखेरचा श्वास असलेले ठिकाण आमच्यासाठी स्मारकच : शिरीष घरत



**दै.रायगड नगरी । पनवेल**

अखंड हिंदूंचे रक्षणकर्ते हिंदुहृदसम्राट बाळासाहेब ठाकरे म्हणजे एक तलवार आणि त्यांच्या लढ्यात ढाल बनून राहणाऱ्या शिवसैनिकांच्या मातोश्री स्व.मीनाताई ठाकरे. अखंड शिवसैनिकांसह इतर राजकीय पदाधिकारीही आदराने सन्मान करायचे अशा मातोश्रींच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी अखंड भारतात आजचा दिवस ममता दिन म्हणून साजरा केला जातो. आज पनवेल तालुक्यातील शेडूग याठिकाणी मातोश्रींनी अखेरचा श्वास घेतला होता, त्याठिकाणी रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या माध्यमातून स्व.मीनाताई ठाकरे यांचे स्मारक उभारण्यात आले. या स्मारकाचा उद्घाटन सोहळा ममता दिनाच्या निमित्ताने जिल्हाप्रमुख शिरीष घरत, रायगड जिल्हा सल्लागार रमेश गुडेकर, ज्येष्ठ शिवसैनिक माधव भिडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

बाळासाहेब ठाकरे यांच्या पत्नी मीनाताई ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त अखंड भारतातून त्यांना अभिवादन करण्यात येत असते. ज्या ज्या ठिकाणी बाळासाहेबांचे कार्यकर्ते आहेत ते मातोश्री म्हणजे कोणते मातृत्व हे जगासमोर ठेवत असते मात्र अखंड महाराष्ट्रातील जनतेला मातोश्री म्हणजे काय हे वेगळे सांगण्याची गरज पडत नाही. बाळासाहेब ठाकरे यांच्या झंजावातात मातोश्री मीनाताई ठाकरे यांचा सिंहाचा वाटा होता. जर बाळासाहेब हे तोफगोळा असतील तर मीनाताई ह्या तोफ होत्या, जर बाळासाहेब हे तलवार असतील तर मीनाताई ह्या ढाल होत्या अशी व्याख्या बनण्यास वेळ लागणार नाही. शिवसेना घडवण्यात मीनाताईंनी वेळोवेळी आपले सामर्थ्य दाखविल्याचे अनेक संदर्भ इतिहासात कोरले आहेत. शिवसैनिकांची माय म्हणून त्यांनी अनेक जबाबदाऱ्या पेलल्या आणि झेलल्या देखील. बाळासाहेबांच्या शिवसेनेच्या घोडदौडीत त्यांनी बाळासाहेबांपेक्षाही शिवसैनिकांची काळजी अधिक घेतली, आणि म्हणूनच कट्टर शिवसैनिकांनी त्यांना आईचा दर्जा दिला. आजही संपूर्ण रायगड जिल्हास्तरीय शिवसेनेचे नेते पनवेल तालुक्यातील शेडुंग याठिकाणी पोहोचले आणि मॉसाहेब मीनाताई ठाकरे यांच्या स्मारकासमोर नतमस्तक झाले.

यावेळी रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत, ज्येष्ठ शिवसैनिक माधव भिडे, उपजिल्हा प्रमुख रामदास पाटील, परेश पाटील, सल्लागार रमेश गुडेकर, पनवेल तालुका संघटक भरत पाटील, तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल, विधानसभा संघटक दीपक निकम, विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर, पनवेल महानगरप्रमुख रामदास शेवाळे, उप महानगरप्रमुख दीपक घरत, तालुका प्रमुख ज्ञानेश्वर बडे, तालुका प्रमुख रघुनाथ पाटील, उप तालुका प्रमुख एकनाथ म्हात्रे, भिंगार शाखाप्रमुख संदीप घोगरे, प्रकाश पाटील, प्रितम घोगरे, अनिल फडके, रुपेश शेंद्रे, दिलीप घोगरे, मारुती म्हात्रे, नरेश पाटील, दिलीप पाटील, विष्णू लहाने, कैलास पाटील, प्रतीक पाटील, धनाजी घोगरे, ज्ञानेश्वर पाटील, निलेश शेंद्रे, राम माळी, लक्ष्मण पाटील, काना घरत, कृष्णा शेंद्रे, सुमित दास, महेंद्र पाटील, नरेश पाटील, यतीन देशमुख, ज्ञानेश्वर भंडारी, डी.एन.मिश्रा, किरण पाटील, संदीप तांडेल, नरेश भगत, महिला आघाडीच्या रायगड उपजिल्हा संघटीका सौ. कल्पना पाटील, विधानसभा संघटीका सौ. रेवती सकपाळ, तालुका संघटीका सौ. प्रमिला कुरघोडे, ग्रामीण तालुका संघटीका अनिता डागरकर, पनवेल शहर संघटीका अपूर्वा प्रभु, पनवेल शहर संघटीका सौ.कुलकर्णी, शिवसेना पनवेल उपतालूका प्रमुख सौ. संगिता संजय भंडारकर, गुळसुंदे विभाग प्रमुख सौ.नूतन रमाकांत पाटील, उपसरपंच वावेघर शिवसेना सौ. श्रुती ज्ञानेश्वर माळी आदींसह शिवसेनेच्या महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अभिवादन केले.

# महड येथे अवैध थाई मागूर माशांचे संवर्धन करणाऱ्या इसमावर कारवाई

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली यांनी दि. २२ जानेवारी २०१९ रोजीच्या आदेशानुसार अवैध थाई मागूर माशांच्या प्रजनन, मत्स्यपालन, वाहतुक व विक्री करण्यावर बंदी घातली असून, प्रतिबंधित मागूर माशांचे अस्तित्वात असलेले मत्स्यसाठे नष्ट करण्याचे निर्देश दिले आहेत.

त्यानुसार प्रादेशिक उपआयुक्त, मत्स्यव्यवसाय महेश देवरे रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, सुरेश भारती यांच्यासह सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी श्रीम.अजया भाटकर, चेतन निवळकर व परवाना अधिकारी श्रीम.रश्मी आंबुलकर यांनी खालापूर तालुक्यातील महड येथे अवैध थाई मागूर माशांचे संवर्धन करणाऱ्या इसमावर पोलीस स्टेशन, खालापूर येथे कलम १८८ शासन आदेशाचा अवमान करणे, कलम २६८ सर्व लोकांना सामाईकपणे होणारे नुकसान, धोका अगर त्रास होतो, अगर त्यांना कोणताही सार्वजनिक हक्क वापरण्याचा प्रसंग येईल त्या व्यक्तींना नुकसान, अटकाव धोका किंवा त्रास होणे अपरिहार्य आहे, अशी कोणतीही कृती करणारी किंवा कोणत्याही बेकायदेशीर अकृतीबद्दल दोषी असणारी व्यक्ती सार्वजनिक उपद्रवाबद्दल दोषी असते, कलम २७३ अपायकारक पदार्थ तो अपायकारक आहे, असे माहीत असूनदेखील त्याची जाणूनबुजून विक्री या कलमांतर्गत एफआयआर करुन गुन्हा दाखल केला आहे.

महड येथील या इसमाच्या तळ्यातील बेकायदेशीर थाई मागूरचा साठा जप्त करून नष्ट करण्याची कारवाई विभागाकडून करण्यात येत आहे, असे सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, श्री.सुरेश भारती यांनी कळविले आहे.

# पाली खोपोली राज्य महामार्गावरील परळी गावात वाहतूक कोंडीची समस्या गंभीर

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यातील महत्वाची बाजारपेठ असलेल्या व पाली खोपोली राज्य महामार्गावर असलेल्या परळी गावात वारंवार वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे येथील पादचारी, प्रवासी व नागरिक हैराण झाले आहेत. वाहतूक कोंडी कधी सुटणार ?असा सवाल सातत्याने उपस्थित होतोय. लोकप्रतिनिधी, नेते मंडळी या समस्येवर तोडगा काढण्यासाठी कधी प्रामाणिक प्रयत्न करतील अशी विचारणा जन मानसातून होतेय.

सुधागड तालुक्याचे प्रवेशद्वार म्हणून परळी गाव व येथील बाजारपेठेची ओळख आहे. पाली खोपोली राज्य महामार्गाच्या दोन्ही बाजूला परळी गाव व बाजारपेठेत पसरलेली आहे. आजूबाजूच्या चाळीस-पंचेचाळीस गावांतील तसेच आदिवासी वाड्यांतील लोक या बाजारपेठेवर अवलंबून आहेत. येथे दुतर्फा अस्ताव्यस्त उभी असलेली सहा आसनी वाहने व रिक्षा, इतर वाहने आणि दुचाकीमुळे इतर वाहनांना जाण्यास मार्ग मिळत नाही. नवीन वर्षात अनेक जण अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीला जात आहेत. तसेच मुंबई व पुणे आणि कोकणात जाण्यासाठी या मार्गाचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. शिवाय अवजड वाहनांची देखील रेलचेल असते. परिणामी वाहतूक कोंडी अधिक बिकट होत आहे. यासंदर्भात वारंवार तक्रारी करून देखील कोणीही ठाम भूमिका घेतांना दिसत नाही. असे येथील नागरिकांचे म्हणणे आहे.


मा.गोडसे सो.

अॅड.प्रिया मोरे

**जाहीर नोटीस**

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१९६१/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१५/०२/२०२२

सौ.पुष्पा सिंग
वय : ५९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.फ्लॅट नं.३०२, ३ रा मजला,
श्रीजी आराधन बिल्डींग, प्लॉट नं.२६१,
जी.ई.एस.,सेक्टर १७, उलवे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

वरील अर्जदार यांचा मुलगा कै.श्री.दिपेंद्र सिंग यांचे दि.२०/०७/२०२० रोजी मॉन्ट्रियल, कॅनडा येथे अल्पशा आजाराने मयत झाले. मयत कै. श्री.दिपेंद्र सिंग यांचे नांवे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मालमत्तेचे वर्णन :- फ्लॅट नं.३०२, ३ रा मजला, श्रीजी आराधन बिल्डींग, प्लॉट नं.२६१, जी.ई.एस., सेक्टर १७, उलवे, ता.पनवेल, जि.रायगड**

**मुल्यांकन :- रुपये ४५,००,०००/- (रु.पंचेचाळीस लाख मात्र)**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०६/०१/२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**


# मराठी पत्रकार दिनाचे औचित्य साधत 'समाजयोद्धां'चा सन्मान



**दै.रायगड नगरी । खोपोली**

मराठी पत्रकार दिनाचे औचित्य साधून दि. ६ जानेवारी २०२२ रोजी कोकण मॅरेज हॉल अंजरूण गांव (खोपोली) येथे कोरोना काळात जिवाची पर्वा न करता काम करणारे स्वच्छता कर्मचारी, पाणी पुरवठा कर्मचारी, आरोग्य कर्मचारी, महावितरण कर्मचारी, रेशन दुकानदार, पोलीस अधिकारी - कर्मचारी व पत्रकार यांचा त्यांनी समाज व देशासाठी केलेल्या कार्याची दखल घेत अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशन (-इगत्र), पोलीस मित्र संघटना नवी दिल्ली (भारत), खालापूर तालुका ग्रामीण पत्रकार संघ, आ.रोहित पवार फाउंडेशन कोकण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने छोटेखानी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला प्रथमतः महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी पोलिस मित्र असोसिएशन (नवी दिल्ली -भारत) चे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष नगरसेवक सुनील पाटील, जेष्ठ पत्रकार हनुमंतराव ओव्हाळ, खालापूर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत गोपाळे, वरिष्ठ पत्रकार प्रविण जाधव, खोपोली महावितरण अभियंता सतीश गढरी, पोलिस मित्र संघटना प्रदेश प्रभारी हरीश काळे, राष्ट्रवादी काँग्रेस विद्यार्थी संघटना मराठवाडा प्रदेश उपाध्यक्ष आकाश हिवराळे, औरंगाबाद महापालिका शॅडो मंत्रिमंडळाचे महापौर विकास शिंदे, श्री ताकई विठ्ठल मंदिर देवस्थान उपाध्यक्ष जयंत पाटील, उद्योजिका कांचनताई जाधव, नॅशनल स्पोर्ट्सपर्सन शितलताई गायकवाड, खालापूर तालुका ग्रामीण मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष सुधीर माने व्यासपीठावर उपस्थित होते.

या सोहळ्यात रणरागिणी शितलताई गायकवाड, तहसिल प्रशासन खालापूर, खोपोली नगर परिषद प्रशासन, खालापूर नगर पंचायत प्रशासन, जेष्ठ पत्रकार हनुमंतराव ओव्हाळ, प्रेस क्लब खालापूर, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी, खालापुर तालुका पत्रकार संघ, रायगड जिल्हा जर्नालिस्ट असोसिएशन, सहज सेवा फाउंडेशन खोपोली, खालापूर तालुका ग्रामीण मराठी पत्रकार संघ, अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशनचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष पत्रकार सागर जाधव, रायगड न्यूज संपादक गौस खान पठाण, साप्ताहिक बहुजन संकल्पचे आकाश जाधव, तय्यब खान, युवा उद्योजक निलेश यशवंत मोने, स्वच्छता कर्मचारी खोपोली, स्वच्छता कर्मचारी खालापूर, पाणीपुरवठा कर्मचारी खोपोली, पाणीपुरवठा कर्मचारी खालापूर, महावितरण कर्मचारी, शासकीय वैद्यकीय रुग्णालय आरोग्य कर्मचारी, पोलीस कर्मचारी, शिवसेना अवजड वाहतूक सेना उपसचिव अल्ताफ मंसूरी, सुधाकर बुवा पाटील, राष्ट्रीय किर्तनकार सचिन महाराज तांडेल, पत्रकार सुधीर देशमुख, संजय पाटील, प्रविण जाधव, पंकेश जाधव, जलाउद्दीन शेख, प्रशांत गोपाळे, पंढरीनाथ कुरंगले, नवज्योत पिंगळे, शिवाजी जाधव, गुरूनाथ साठेलकर, समाधान दिसले, नरेश जाधव, सचिन यादव, रोहिदास जाधव, दिनेश पाटील, प्रसाद अटक, संतोष गोतारणे, राकेश खराडे आदींचा सत्कार करण्यात आला.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि शासन आदिवासी बांधवांच्या सदैव पाठीशी

आदिवासी बांधवांसाठी महत्वाचा दिवस असून सर्व आदिवासी बांधवांच्या जीवनात सुधारणा आणणे, हे शासनाचे कर्तव्यच आहे. जिल्ह्यातील कर्जत, सुधागड या तालुक्यांमध्येही अशा प्रकारचे कार्यक्रम आयोजित करावेत. आज आदिवासी बांधवांना हे वन हक्कांचे दस्तऐवज वाटप झाले आहेत, त्याचप्रमाणे त्यांना शासनाच्या इतर योजनांचीही लाभ देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. सध्या कोविड-१९ चा प्रादूर्भाव वाढत आहे, त्यामुळे सर्वांनी काळजी घ्यावी. कोविड अनुरुप वर्तनाचे पालन करीत आपले आरोग्य सांभाळा. सर्वांनी कोविड प्रतिबंधक लसीचे दोन्ही डोस घ्यावेत.

यावेळी बोलताना अलिबाग उप वनसंरक्षक आशिष ठाकरे म्हणाले की, आजचा दिवस हा ऐतिहासिक दिवस आहे. आदिवासी बांधवांच्या दृष्टीने हा एक महत्वाचा दिवस आहे. जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली कातकरी उत्थान अभियानांतर्गत आदिवासी कातकरी समाजातील बांधवाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी सप्तसूत्री आखली असून त्यांच्या वन हक्कांचे ६ हजार २६८ दावे निकाली काढण्यात आले आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तहसिलदार स्वप्नाली डोईफोडे यांनी केले तर प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार यांनी आभार प्रदर्शन केले.

## कार्ला येथील श्री एकविरा देवी मंदिरात १० जानेवारीला महाआरतीचे आयोजन

शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आगरी-कोळी समाज व समस्त एकविरा भक्त-भाविकांच्यावतीने कार्ला लोणावळा येथील श्री एकविरा देवी मंदिरात सोमवार, दिनांक १० जानेवारी २०२२ रोजी सकाळी ठीक ११:३० वाजता देवीच्या महाआरतीचे आयोजन करण्यात आले आहे.

देवीच्या या महाआरतीस आगरी सेना प्रमुख राजाराम साळवी, आगरी सेना नेते प्रदीप साळवी, आगरी युवासेना प्रमुख राहुल साळवी यांना तसेच सर्व जिल्हाप्रमुख यांना निमंत्रित केल्याचे मुंबई प्रदेश आगरी सेना अध्यक्ष जयेंद्र खुणे यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले आहे.


मा.पांडे साहेब

श्री.सचिन बा. कांबळे
अर्जदारांचे वकील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात

फौ.चौ.अर्ज नं.२५/२०२२
ने.ता.०९/०२/२०२२

सौ.रिहाना फिरोज शेख
वय : २६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.यशोधन हौ.सो., प्लॉट नं.एफ/३१, रुम नं.५,
सेक्टर १२, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

पनवेल शहर महानगरपालिका
विभाग-खारघर
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कुमारी. आसिया फिरोज शेख हिचा जन्म दि.०६/०३/२०१३ रोजी सहवास हौ.सो., एफ-४४/७, शिवाजी चौक, सेक्टर-१२, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे. परंतु काही कारणास्तव आई वडिलांकडून अनावधानाने कु.आसिया फिरोज शेख यांची जन्माची नोंद करायची राहून गेली आहे. परंतु काही कारणास्तव जन्माची नोंद करून घेणे व जन्माची नोंद कुठे करतात व कशासाठी करून घेतात याची आम्हा आई वडिलांना काही पूर्व कल्पना नव्हती.

तरी अर्जदार यांच्या जन्माची नोंद बद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या मागणी बद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते सदरचा अर्ज जन्म-मृत्यू नोंदणी कायदा १९६९ कलम १३/३ प्रमाणे जन्माची नोंदणी परवानगीचा अर्जदारांचा अर्जातील मागणी विनंती सिद्ध झाल्यास त्यांना हे जन्माची नोंद मंजूर करेल.

आज दि.६/०१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**



मा.पांडे साहेब

श्री.सचिन बा. कांबळे
अर्जदारांचे वकील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात

फौ.चौ.अर्ज नं.२४/२०२२
ने.ता.०९/०२/२०२२

सौ.रिहाना फिरोज शेख
वय : २६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.यशोधन हौ.सो., प्लॉट नं.एफ/३१, रुम नं.५,
सेक्टर १२, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

पनवेल शहर महानगरपालिका
विभाग-खारघर
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कु. आफ्रिन फिरोज शेख हिचा जन्म दि.०१/०४/२०११ रोजी सहवास हौ.सो., एफ-४४/७, शिवाजी चौक, सेक्टर-१२, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे. परंतु काही कारणास्तव आई वडिलांकडून अनावधानाने कु.आफ्रिन फिरोज शेख यांची जन्माची नोंद करायची राहून गेली आहे. परंतु काही कारणास्तव जन्माची नोंद करून घेणे व जन्माची नोंद कुठे करतात व कशासाठी करून घेतात याची आम्हा आई वडिलांना काही पूर्व कल्पना नव्हती.

तरी अर्जदार यांच्या जन्माची नोंद बद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या मागणी बद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते सदरचा अर्ज जन्म-मृत्यू नोंदणी कायदा १९६९ कलम १३/३ प्रमाणे जन्माची नोंदणी परवानगीचा अर्जदारांचा अर्जातील मागणी विनंती सिद्ध झाल्यास त्यांना हे जन्माची नोंद मंजूर करेल.

आज दि.६/०१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**



मा.पांडे साहेब

श्री.सचिन बा. कांबळे
अर्जदारांचे वकील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात

फौ.चौ.अर्ज नं.२८/२०२२
ने.ता.०९/०२/२०२२

सौ.मान्यवरा शबीर शेख
वय : ४० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.श्री.निवृत्ती रा.कडू चाळ, रुम नं.बी-०२,
मु.पो.खारघर गाव, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

पनवेल शहर महानगरपालिका
विभाग-खारघर
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कुमारी. शिफा शबीर शेख हिचा जन्म दि.२७/०७/२००९ रोजी सहवास हौ.सो., एफ-४४/७, शिवाजी चौक, सेक्टर-१२, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे. परंतु काही कारणास्तव आई वडिलांकडून अनावधानाने कु.शिफा शबीर शेख यांची जन्माची नोंद करायची राहून गेली आहे. परंतु काही कारणास्तव जन्माची नोंद करून घेणे व जन्माची नोंद कुठे करतात व कशासाठी करून घेतात याची आम्हा आई वडिलांना काही पूर्व कल्पना नव्हती.

तरी अर्जदार यांच्या जन्माची नोंद बद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या मागणी बद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते सदरचा अर्ज जन्म-मृत्यू नोंदणी कायदा १९६९ कलम १३/३ प्रमाणे जन्माची नोंदणी परवानगीचा अर्जदारांचा अर्जातील मागणी विनंती सिद्ध झाल्यास त्यांना हे जन्माची नोंद मंजूर करेल.

आज दि.६/०१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**



Shri.Rao Saheb

Adv.Vishal Anant Mundkar

**PUBLIC SUMMONS**

IN THE COURT OF CIVIL JUDGE SR.DIVISION
PANVEL, AT-PANVEL

R.C.S. 295/2016
Exh : 46/D
Next Date : 31/01/22

Shree.Vijaykumar N. Shinde — Plaintiff
V/S
M/S.Suraj Enterprises & Others — Defendant

To,
M/s. Suraj Enterprises Through its Proprietor Shree Shirishkumar Rangraj Chavan, Having its office at-C/324, 1 st Floor, Vashi Plaza, Plot No.80/81, Sector-17, Vashi, Navi Mumbai-400705

You, (Defendant No.1) are hereby summoned to appear in this Court in person or by a pleader duly instructed, & able to answer all the material questions relating to the suit, or who shall be accompanied, by some person able to answer all such questions on the 31 st day of January 2022, at 11:00 a.m. or soon thereafter

You are directed to produce on that day all the witnesses on whose evidence you rely upon & documents upon which intend to rely in support of your defense

In default of appearance on the day above mentioned, the suit will be heard and determined in your absence

Given under my hand and seal of the Court, this 5 th day of JANUARY, 2022

Sd/- Juniour Clerk Civil Judge Sr.Div. Panvel — (Court Seal) — Sd/- Assi.Superinted. Civil Judge Sr.Div. Panvel


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# कर्तृत्व आणि दातृत्व असलेले लोकनेते रामशेठ ठाकूर एकमेव व्यक्तिमत्व : रामदास फुटाणे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पुस्तकातून आत्मसंवाद आणि त्यातून निर्णय घेण्याची क्षमता निर्माण होते, त्यामुळे इंग्रजी ज्ञानभाषा असली तरी निर्णय क्षमता मातृभाषेत आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ कवी व साहित्यिक रामदास फुटाणे यांनी राज्यस्तरीय दिवाळी अंक पारितोषिक वितरण समारंभात खांदा कॉलनी येथे केले.



शैक्षणिक, सामाजिक, वैद्यकीय, कला, क्रीडा, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या १८, १९ आणि २० व्या राज्यस्तरीय व रायगड जिल्हास्तरीय या सर्वात मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली (बुधवार, दि. ०५ जानेवारी) खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयात (स्वायत्त) मोठ्या उत्साहात आणि समारंभपूर्वक संपन्न झाले. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून रामदास फुटाणे बोलत होते.

कोरोना संदर्भातील नियमांचे पालन करून झालेल्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालय महासंचालक दिलीप पांढरपट्टे, ललित मासिकाचे स्तंभलेखक रविप्रकाश कुलकर्णी, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्याध्यक्ष वाय. टी. देशमुख, भाजपचे शहर अध्यक्ष जयंत पगडे, नगरसेवक अनिल भगत, मनोज भुजबळ, प्रभाग समिती सभापती सुशिला घरत, हेमलता म्हात्रे, ज्येष्ठ पत्रकार नीला उपाध्ये, दीपक म्हात्रे, तसेच साहित्यप्रेमी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस अनाथांची आई सिंधुताई सपकाळ यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

राज्यस्तरीय २०१८ च्या स्पर्धेत प्रथम क्रमांक 'अधोरेखित' दिवाळी अंकाने, द्वितीय क्रमांक 'चतुरंग अन्वय', तृतीय क्रमांक 'झपूर्झा', सर्वोत्कृष्ट बाळ दिवाळी अंक 'वयम', उत्कृष्ट विशेषांक 'ॲग्रोवन', उत्कृष्ट कथा 'चंद्रकांत', उत्कृष्ट व्यंगचित्र ' हास्यधमाल', उत्कृष्ट मुखपृष्ठ 'दीपावली', सन २०१९ च्या स्पर्धेत प्रथम क्रमांक 'शाश्वत वनीकरण' आणि 'उद्याचा मराठवाडा', द्वितीय क्रमांक (विभागून) 'दीपावली' आणि 'पुरुष उवाच', तृतीय क्रमांक (विभागून) 'दुर्ग–शोध गडकिल्यांचा' आणि 'दुर्गाच्या देशातून', उत्कृष्ट विशेषांक 'समपथिक', उत्कृष्ट कविता 'खोडलेली कविता– कालनिर्णय', उत्कृष्ट व्यंगचित्र 'दीपावली', उत्कृष्ट मुखपृष्ठ 'चतुरंग अन्वय', उत्कृष्ठ अंतर्गत सजावट 'अक्षरधारा' तर सन २०२० च्या स्पर्धेत 'अनलॉक' आणि 'लोकदीप' या अंकांनी विभागून प्रथम क्रमांक, 'संवादसेतू' व 'आंतर–भारती' या अंकांनी विभागून द्वितीय क्रमांक, 'कुबेर' व 'ओंजळीतील अक्षरे' या अंकांनी विभागून तृतीय क्रमांक, सर्वोत्कृष्ट बाळ दिवाळी अंक 'छावा', उत्कृष्ट विशेषांक 'तेजोमय', उत्कृष्ट कथा 'पॉपी टिअर(व्यासपीठ)', उत्कृष्ट कविता– सकाळ ('खरवडून पाहीन म्हणते'), उत्कृष्ट व्यंगचित्र 'आक्रोश (संजय मिस्त्री)', उत्कृष्ट मुखपृष्ठ 'दीपावली', उत्कृष्ठ अंतर्गत सजावट 'किल्ला' या अंकांने तर रायगड जिल्हास्तरीय २०१८ च्या स्पर्धेत 'साहित्यआभा' अंकाने प्रथम, 'लोकसेवक' अंकाने द्वितीय क्रमांक, तृतीय क्रमांक 'उरण समाचार', सन २०१९ च्या स्पर्धेत प्रथम क्रमांक 'पर्ण', 'उरण समाचार' ने द्वितीय तर तृतीय क्रमांक वादळवारा अंकाने तसेच सन २०२० च्या स्पर्धेत 'आगरी दर्पण'ने प्रथम, 'इंद्रधनु' ने द्वितीय तर 'रामप्रहर' अंकाने तृतीय क्रमांक पटकाविला. त्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक रक्कम धनादेश आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

> मराठी साहित्य संस्कृतीला उज्ज्वल परंपरा असून दिवाळी अंक यातील एक महत्वाचा भाग आहे. 'दिवाळी अंक हा मराठी संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. दिवाळीला जसे दारात आकाशकंदील लागतात, तसे मनामनात विचारांचे कंदील चेतवण्याचे काम दिवाळी अंक करतात. साहित्य आपल्याला आत्मिक सुख देतो त्यामुळे मातृभाषेची किंमत अनन्य साधारण आहे.
>
> **- लोकनेते रामशेठ ठाकूर**

या स्पर्धेचे परिक्षक म्हणून ज्येष्ठ पत्रकार नीला उपाध्ये, अरविंद कुलकर्णी, प्रा. डॉ. दीपा ठाणेकर, महेश कुलसंगे, प्रा. नम्रता पाटील, सुनिल कर्णिक, प्रा. डॉ. अलका मटकर, प्रा. जयप्रकाश लब्दे, विजय कुलकर्णी, प्रा. वर्षा माळवदे, नम्रता कडू, रामदास खरे, प्रतिष्ठा सोनटक्के यांनी काम पाहिले.

> कोरोनाच्या संकटात लाटा येतच रहाणार आहेत. कितीही लाटा येऊ द्या पप्रत्येक क्षण आनंदाने जगले पाहिजे. २०२०- २१ मध्ये जिवंत राहण्याचे चॅलेंज होते ते वर्ष सरले पण आता प्रत्येकाने स्वतःची काळजी घेणे गरजेचे आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर आणि माझी जुनी ओळख आहे, आजही त्यांच्याकडे जाण, नम्रपणा, आहे. त्यामुळे संवेदनशील व्यक्तिमत्व म्हणून त्यांच्याप्रती भावना आहेत.
>
> **- दिलीप पांढरपट्टे**

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दीपक म्हात्रे यांनी तर परीक्षक मनोगत नीला उपाध्ये यांनी व्यक्त केले. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या दिवाळी अंकाच्या प्रदर्शनाचा लाभ साहित्यप्रेमींनी घेतला. तसेच दिवाळी अंक स्पर्धेसंदर्भात मल्हार टीव्हीच्या माध्यमातून सादर झालेल्या डॉक्युमेन्ट्रीचे उपस्थित मान्यवर व साहित्यप्रेमींनी कौतुक केले.

भरघोस पारितोषिक असलेली हि सर्वात मोठी दिवाळी अंक स्पर्धा. राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाला ७५ हजार रुपये आणि जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक ३० हजार रुपये असे स्वरूप. लोकनेते रामशेठ ठाकूर त्यांच्या भाषणाला उभे राहिले. यांनी पुढच्या वर्षीपासून राज्यस्तरीय प्रथम क्रमांकासाठी थेट ०१ लाख रुपये तर जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकासाठी ५० हजार रुपयाचे बक्षिस देण्याचे जाहीर केले. आणि पुढच्या क्षणातच टाळ्यांच्या कडकडाट सर्व साहित्यिक, कवी, लेखक, निर्माते, साहित्यप्रेमींनी लोकनेते ठाकूर यांच्याप्रती आभार व्यक्त केले. लोकनेते रामशेठ ठाकूर एवढ्यावरच थांबले नाहीत, तर प्रथम दिवाळी अंकाचे प्रणेते का. घ. मित्र यांच्या जीवनावर साहित्य विश्वात एकही पुस्तक अद्यापपर्यँत अस्तित्वात आले नाही याची खंत या कार्यक्रमात रविप्रकाश कुलकर्णी यांनी व्यक्त केली होती. त्यावर बोलताना तुम्ही पुस्तकाच्या निर्मितीच्या कामाला लागा. मी का. घ. मित्र यांचे चरित्र रूप पुस्तकरुपी आणण्यासाठी सर्वोतपरी मदत करेन, असे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी जाहीर करत त्यांना आश्वस्थ केले. त्यामुळे या समारंभात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी साहित्यप्रेमींच्या भावना जपत त्यांना बळ देण्याचे काम केल्याची प्रतिक्रिया साहित्यप्रेमींनी दिली.

# रायगडने लोकनृत्यात पहिला तर लोकगीतात पटकाविला दुसरा क्रमांक

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, अंतर्गत उपसंचालक क्रीडा व युवक सेवा मुंबई विभाग तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रायगड यांच्यावतीने युवांच्या सुप्त कला गुणांना वाव देण्यासाठी १५ ते २९ वयोगटातील युवक– युवतींसाठी दि.०४ जानेवारी २०२२ रोजी मुंबई विभागीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात रायगड जिल्ह्याने लोकनृत्यात पहिला तर लोकगीतात दुसरा क्रमांक पटकाविला.

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या सूचनेप्रमाणे जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन आले. या युवा महोत्सवामध्ये लोकगीत व लोकनृत्य या प्रकारांचा फक्त समावेश करण्यात आला होता. युवा महोत्सवांमध्ये मुंबई विभागातील ठाणे, पालघर, रायगड, मुंबई शहर व मुंबई उपनगर या जिल्ह्यातील स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेचे उद्घाटन रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सहभागी स्पर्धकांना मार्गदर्शन करताना आदिती तटकरे यांनी शुभेच्छा दिल्या व युवा महोत्सवांमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व स्पर्धकांनी आपल्या कलेचे प्रदर्शन करून या स्पर्धेमध्ये प्राविण्य मिळवावे तसेच राज्यस्तरीय युवा महोत्सव मध्ये मुंबई विभागाला नावलौकिक मिळवून द्यावा, असे आवाहनही केले. युवा महोत्सवाचा निकाल पुढीलप्रमाणे आहे. १) लोकगीत – प्रथम – पालघर जिल्हा, द्वितीय रायगड जिल्हा आणि तृतीय मुंबई शहर जिल्हा २) लोकनृत्य – प्रथम – रायगड जिल्हा, द्वितीय पालघर जिल्हा आणि तृतीय मुंबई शहर जिल्हा, यासर्व विजेत्या स्पर्धकांचे पालकमंत्री ना.कु.आदिती तटकरे व जिल्हा क्रीडा अधिकारी श्री.रविंद्र नाईक यांनी अभिनंदन केले व राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. या महोत्सवाच्या आयोजनासाठी रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व मुंबई शहर येथील सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# भाजप कामगार आघाडीच्या राज्य उपाध्यक्षपदी संजय पवार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

देशविदेशातील लाखो कामगारांच्या साठी मदत आणि हजारो आंदोलना मधून त्यांचा न्यायहक्कासाठी लढा देणारे संजय वासुदेव पवार यांची नियुक्ती भाजप कामगार आघाडीचे पालक संजय केणेकर आणि प्रदेश अध्यक्ष गणेश ताठे यांचा माध्यमातून महाराष्ट्र राज्याच्या प्रदेश उपाध्यक्ष पदी नेमणूक करण्यात आली.

त्या बद्दल अनेक सामाजिक संस्था आणि कामगार वर्ग कडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून पनवेल पत्रकार मंचाने केला पत्रकार दिन साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पत्रकार दिनाचे निमित्ताने आणि ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील यांच्या जन्मदिनाच्या औचित्याने पनवेल तालुका पत्रकार विकास मंचने पनवेल तालुक्यातील भोकरपाडा येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे आणि खाऊचे वाटप केले. तसेच गेल्या दोन शैक्षणिक वर्षांत नैपुण्य प्राप्त केलेल्या मंचातील सदस्यांच्या मुलांचा सन्मान करण्यात आला.



मराठी वृत्तपत्र क्षेत्राचे जनक दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करून कार्यक्रमाला प्रारंभ करण्यात आला. मंचाचे सरचिटणीस मंदार दोंदे यांनी प्रास्ताविक सादर केले. यावेळी जिल्हा परिषद शाळेतील मुलांना वह्या, पेन असे शैक्षणिक साहित्य तसेच टूथपेस्ट,टूथब्रश,मास्क असे स्वच्छता किट आणि खाऊचे वाटप करण्यात आले.

आपले मनोगत व्यक्त करताना माधव पाटील म्हणाले की पनवेल तालुका पत्रकार विकास मंच हा सातत्याने सामाजिक बांधिलकी जपत आलेला आहे. दर वर्षी नित्यनेमाने दुर्गम ग्रामीण विभागातील मुलांना आम्ही शैक्षणिक साहित्याचे आणि खाऊचे वाटप करत असतो. सत्कार समारंभ आणि पुरस्कारांचे नेत्रदीपक सोहळे आयोजित करण्यापेक्षा दुर्गम ग्रामीण विभागात जाऊन,तेथील लोकांच्यात उतरून त्यांच्यात मिळून मिसळून काम करण्यात खरा आनंद प्राप्त होतो. पनवेल तालुका पत्रकार विकास मंच यातील प्रत्येक सदस्य एखाद्या क्रिकेट टीम सारखे सहभागी होत असतात. प्रत्येक सदस्याचे योगदान असते. सर्वत्र माझ्या नावाचा गवगवा होत असला तरी देखील मी नाममात्र कर्णधार आहे खरी मेहनत ही मंचातल्या प्रत्येक सदस्याची आहे.

भोकरपाडा येथे झालेल्या कार्यक्रमाला अध्यक्ष माधव पाटील, सरचिटणीस मंदार दोंदे, उपाध्यक्ष हरीश साठे,खजिनदार नितिन फडकर, विवेक मोरेश्वर पाटील, संजय कदम, अविनाश कोळी, अनिल कुरघोडे, अनिल भोळे, राजेंद्र पाटील, राजू गाडे, प्रवीण मोहोकर, मयूर तांबडे, भरत कुमार कांबळे, सुनील राठोड, स्वर्गीय बाबू हशा पाटील प्रतिष्ठानचे अध्यक्ष धनंजय पाटील, खजिनदार रुपेश फुलोरे, कल्पेश फुलोरे, हनुमान फुलोरे, किशोर फुलोरे, शिक्षिका समृद्धी सुधीर पाटील, प्रकाश राजगे आदी मान्यवर उपस्थित होते.

मा.गोडसे सो.

अॅड.प्रिया मोरे

## जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१८६५/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.०८/०२/२०२२

१) श्रीमती.सुशिला मोतीलाल सिंग
वय : ५४ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.पंकज मोतीलाल सिंग
वय : ३४ वर्षे, धंदा : नोकरी
दोघे रा.फ्लॅट नं.००५, २ रा मजला, त्रिमुर्ती अपार्टमेंट, प्लॉट नं.१४, सेक्टर ६, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड
३) सौ.रंजना राजेश चौहान
(लग्नापूर्वीचे नाव रंजना मोतीलाल सिंग)
वय : ३८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.फ्लॅट नं.सी २०२, ऑक्स्फर्ड सीएचएस, घोडबंदर रोड, ग्रीन वुड कॉम्प्लेक्स, ठाणे वेस्ट, अपना बझार, महाराष्ट्र
४) सौ.वंदना ऋतुराज पुरोहित
(लग्नापूर्वीचे नाव वंदना मोतीलाल सिंग)
वय : ३६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.१२/१, ज्ञानेश सोसायटी, वारजे, माळवाडी, पुणे, महाराष्ट्र — अर्जदार

वरील अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२, ३ व ४ यांचे वडील कै.मोतीलाल राजाराम सिंग यांचे दि.०९/०४/२०२१ रोजी पॅनासिया हॉस्पिटल, न्यू पनवेल, जि.रायगड येथे आजाराने निधन झाले. मयत कै.मोतीलाल राजाराम सिंग यांचे नांवे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मालमत्तेचे वर्णन :– फ्लॅट नं.००५, २ रा मजला, त्रिमुर्ती अपार्टमेंट, प्लॉट नं.१४, सेक्टर ६, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**

**मुल्यांकन :– रुपये ४,८०,०००/–**
**(रुपये चार लाख ऐंशी हजार मात्र)**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०६/०१/२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मा.गोडसे सो

अॅड.अजित धनराज म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१९८९/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२८/०२/२०२२

१) श्री.अविनाश काळुराम उलवेकर
वय : ५१ वर्षे, धंदा : शेती
२) श्री.दिपक काळुराम उलवेकर
वय : ४८ वर्षे, धंदा : शेती
३) श्री.रुपेश काळुराम उलवेकर
वय : ४१ वर्षे, धंदा : शेती
१ ते ३ रा.पाले बुद्रुक, पो.पडघे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं.१ ते ३ यांची आई कै.रेवती काळुराम उलवेकर ह्या दि.०६/०७/२०२१ रोजी मौजे : पाले बुद्रुक, पो.पडघे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाल्या आहेत.

कै.रेवती काळुराम उलवेकर यांना त्यांच्या वडिलांकडून वारसा हक्काने प्राप्त झालेली व त्यांचे नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील व मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| उलवे | ७ | १ | ०–२०–० |
| | ५५ | ६/७ | ०–२७–९ |
| | ५७ | १ (१) | १–४०–० |
| | ११७ | ० | ३–०–० |

सदरच्या मिळकती ह्या नवीन मुंबई प्रकल्पाकरिता सिडकोने संपादीत केल्या आहेत. वरील संपादीत मिळकतीच्या मोबदल्यात खालीलप्रमाणे भूखंड वाटप करण्यात आले आहे.

| मौजे | सेक्टर | भूखंड नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| उलवे | २३ | १४४ | २४५० चौ.मी. |
| | ५ | ६१ बी | १३५० चौ.मी. |

तसेच वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.रेवती काळुराम उलवेकर यांचे वारसदार या नात्याने कै.रेवती काळुराम उलवेकर यांचे हिश्श्याचे सरकारकडून मिळणारे किंवा सिडकोकडून मिळणारे १२.५ टक्के भूखंड तसेच इतर आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांना तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.सह दिवाणी न्या.व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीतील कै.रेवती काळुराम उलवेकर यांचे हिश्श्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख ०६/०१/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

राव साहेब

अर्जदारांकरिता ॲडव्होकेट अॅड.उदय प्र. मोकल

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब व.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१९०३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०२/०२/२०२२

(कै.इंद्रजित सिंग जागिर सिंग रनधेव यांचे कायदेशीर वारस)
१) श्रीमती.जसप्रीत कौर इंद्रजीत सिंग रनधेव (पत्नी)
वय : ३८ वर्षे, धंदा : गृहिणी
२) कुमारी.मेहकदीप कौर इंद्रजीत सिंग रनधेव (मुलगी)
वय : १६ वर्षे, धंदा : शिक्षण
३) कुमार.हरमन सिंग इंद्रजीत सिंग रनधेव (मुलगा)
वय : १६ वर्षे, धंदा : शिक्षण
१ व २ तर्फे अज्ञान पालनकर्ती आई (अर्जदार क्र.१)
श्रीमती.जसप्रीत कौर इंद्रजीत सिंग रनधेव
अर्जदार क्र.१ ते ३ राहणार
रुम नं.१/४, बिल्डींग नं.डी–९७, सेक्टर नं.६, सात रस्ता, सरोवर को.ऑप.हौ.सोसायटी, कळंबोली नोड, नवी मुंबई, पिन कोड–४१०२०६ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदारांचे म्हणणे असे आहे की, कै.इंद्रजीत सिंग जागिर सिंग रनधेव यांचे निधन दि.२३/०३/२०२१ रोजी अमृतसर, तहसील अमृतसर–१, जिल्हा : अमृतसर, पंजाब येथे झालेले आहे. कै.इंद्रजीत सिंग जागिर सिंग रनधेव यांच्या मृत्यू पश्चात वरीलपैकी अर्जदार हे कै.इंद्रजित सिंग जागिर सिंग रनधेव यांचे कायदेशीर वारस आहेत.

३) अर्जदारांचे म्हणणे असे आहे की, कै.इंद्रजित सिंग जागिर सिंग रनधेव यांनी मौजे : कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनित निवासी सदनिका खरेदी केलेली आहे.

**सदनिकेचे वर्णन**
**मौजे : कळंबोली, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड**
**येथील निवासी सदनिका**
**फ्लॅट नं.१/४,**
**बिल्डींग नं.डी–९७,**
**सरोवर को.ऑप.हौ.सोसायटी,**
**सेक्टर : ६,**
**क्षेत्रफळ : ४०.३ चौ.मीटर**

सदर वरील वर्णनित स्थावर मिळकतीचे वारस दाखला मिळणेकरिता वरील अर्जदार यांनी मे.दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर पनवेल यांचे कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही हक्क, अधिकार, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होवून लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरीलप्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेवून मे.कोर्टात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

दि.०५/०१/२०२२

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्ट मा.राव साहेब

अर्जदारातर्फे वकील
अॅड.श्री.जगदीश ठाकूर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१९२३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१६/०२/२०२२

१) श्रीमती.सुरेखा यशवंत कल्याणकर
वय : ५७ वर्षे
२) श्री.प्रथमेश यशवंत कल्याणकर
वय : २४ वर्षे, धंदा :
दोघे रा.रुम नं.१६, १७, तिसरा मजला, बुऱ्हाणी मंजिल, टपाल नाका, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
३) सौ.ऋतुजा रोहन पाटील
वय : ३६ वर्षे
रा.बी–१०४, मिनल बिल्डींग, चिंचपाडा, ता.पेण, जि.रायगड
४) कु.रोशनी यशवंत कल्याणकर
वय : ३४ वर्षे
रा.रुम नं.१६, १७, तिसरा मजला, बुऱ्हाणी मंजिल, टपाल नाका, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
५) सौ.श्रेया संदीप गायकवाड
वय : ३३ वर्षे
रा.३०३, बी–विंग, तिसरा मजला, युनिक भवन, चिंचपाडा, आगरी समाज हॉलजवळ, पेण, ता.पेण, जि.रायगड
६) सौ.प्राजक्ता रवी रोहेकर
वय : २८ वर्षे
रा.फ्लॅट नं.४०५, के.व्ही.के.अरम., प्लॉट नं.१६६, सेक्टर ४, करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार नं.२ ते ६ यांचे वडील कै.यशवंत आंबाजी कल्याणकर हे तारीख ०७/०६/२०२१ रोजी मयत झालेले असून कै.यशवंत आंबाजी कल्याणकर यांची आई कै.अनुसया आंबाजी कल्याणकर ही देखील मयत झालेली आहे. तसेच कै.चैताली यशवंत कल्याणकर ही देखील तारीख २८/०४/२०२१ रोजी अविवाहित मयत झालेली आहे. अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार नं.२ ते ६ यांचे वडील कै.यशवंत आंबाजी कल्याणकर यांचे मालकीची मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड व मौजे : आंबिवली, ता.पेण, जि.रायगड येथे खालील वर्णनाच्या मिळकती असून सदर मिळकतीस कै.यशवंत आंबाजी कल्याणकर यांच्या नावाची रितसर नोंद आहे. सदर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

**अ) गाळा क्रमांक ७९–ए, क्षेत्रफळ ४६५.०० चौ.फू. कारपेट क्षेत्र, पनवेल महानगरपालिका हद्दीतील अ.भू.क्र.२४७ आरक्षण क्रमांक २७ व २८ मधील इमारत क्रमांक १ व २ मधील गाळा, ता.पनवेल, जि.रायगड**

**ब) मौजे : आंबिवली, ता.पेण, जि.रायगड**

| मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| आंबिवली | ११ | ० | १८–४४–० |

वरील मिळकती संदर्भात अर्जदार यांच्या नावाने वारस दाखला देण्याबाबत कुणाचीही हरकत असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. सदरच्या नोटीसीस मुदतीत हरकत न आल्यास वारस दाखला अर्जदारांच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि.०५/०१/२०२२ रोजी कोर्टाच्या सही–शिक्क्याने दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## नागरिकांनी शिधापत्रिकेसाठी लवकरच व्हेरिफिकेशन करून घ्यावे ; भाजपचे आवाहन

**दै.रायगड नगरी । माथेरान**

शासनाच्या निर्देशानुसार सध्या रेशन दुकानावरील रेशन मिळण्यासाठी कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचे व्हेरिफिकेशनचे काम सुरू असून सदरच्या उपक्रमाकरिता ३१ डिसेंबर २०२१ ही अखेरची मुदत असल्याचे रेशन दुकानदाराच्या वतीने सांगण्यात आले होते. त्यामुळे नागरिकांची चांगलीच दमछाक झाली होती याबाबत दि.३जानेवारी रोजी मा.तहसीलदार कर्जत यांना शिधापत्रिकेच्या व्हेरिफिकेशन करिता अजून मुदतवाढ मिळावी यासाठी माथेरान भारतीय जनता पक्षाच्या वतीने नुकताच निवेदन सादर केले असता नायब तहसीलदार बुरशे यांनी रेशन दुकानदारांना मुदतवाढ असल्याचे कळविले आहे.

तरी सर्व शिधापत्रिका धारकांनी आपल्या कुटुंबातील व्यक्तींचे व्हेरिफिकेशन लवकरात लवकर करून घ्यावे असे आवाहन देखील भारतीय जनता पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे. यावेळी माजी नगरसेवक चंद्रकांत जाधव, प्रदीप घावरे, संदीप कदम, राकेश चौधरी व लक्ष्मण शिंगाडे उपस्थित होते. तसेच येत्या काही दिवसातच आधार कार्ड शिबिर (फिंगर अपडेट्स,नाव व जन्मतारखेत दुरुस्ती व पत्ता दुरुस्ती ) आयोजित करण्यात येणार आहे त्याकरिता १) नावनोंदणी करून घेणे अनिवार्य आहे. २) सदरच्या दुरुस्तीकरिता शासकीय शुल्क भरावे लागेल . ३) नागरिकांनी आवश्यक त्या कागदपत्रांची व्यवस्था करून ठेवावी. ४) विवाहित स्त्रियांच्या नावात बदल हवा असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र अथवा सत्यप्रतिज्ञापत्र सोबत आणावे असेही भाजपकडून सांगण्यात आले आहे.

## खेळू मरवडे पो.पाटील सेवेतून सेवानिवृत्त

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील श्री. क्षेत्र तळवली तर्फे अष्टमी या गावचे पोलीस पाटील खेळू लक्ष्मण मरवडे यांचे गावच्या पोलीस पाटील सेवेतून वयोमानापरत्वे सन्मानाने सेवानिवृत्त झाले आहेत. अतिशय शांत व समाजात मिळून मिसळून राहणारे पो.पाटील खेळू मरवडे यांनी आपल्या सेवाकाळात कोणावरही अन्याय न करता नि:पक्षपातीपणे आपली जबाबदारी पार पाडली.तर आपला गाव व कोलाड पोलीस स्टेशनशी समन्वय साधून गावात शांतता व सलोखा कसा राहिल यासाठी प्रामाणिकपणे आपली जबाबदारी पार पाडली. त्यांच्या सेवानिवृत्ती प्रित्यर्थ तळवली तर्फे अष्टमी गावाने आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात त्यांचा सेवानिवृत्तपर सत्कार करून त्यांच्या कार्याचा गौरव केला. यावेळी मा.सरपंच वसंत मरवडे, सामाजिक कार्यकर्ते मोरेश्वर मरवडे, रामचंद्र मरवडे, एकनाथ मरवडे, मदन कोलाटकर, रविंद्र मरवडे, दयाराम मरवडे, काशिनाथ गायकर, मारूती बामणे, प्रशांत नागावकर यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ, महिला व हनुमान क्रीडा मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

### जेएनपीटी खासगीकरणाच्या प्रश्नावर नेते, पुढाऱ्यांच्या वारंवार बदलत्या भुमिकेमुळे

# कामगारांमध्ये संभ्रमाचे वातावरण

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीटी बंदराच्या खासगीकरणा विरोधात संघर्षाचा पवित्रा घेतलेल्या आणि केंद्र सरकारच्या कामगार विरोधी धोरणांमुळे हतबल झालेल्या विरोधकांनीही आता खासगीकरणाच्या प्रश्नावर जेएनपीटी प्रशासनासमोर नांगी टाकली आहे. जेएनपीटी कंटेनर टर्मिनलचे खासगीकरण झाल्याचे गृहित धरून कामगार विश्वस्त भूषण पाटील यांनीही पीपीपी नंतर कामगारांच्या विविध प्रश्नांवर करार केला जावा अशी लेखी मागणी केंद्र सरकारच्या श्रम आयुक्तांकडे केली आहे.त्यामुळे कामगारांमध्येच सध्या संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

जेएनपीटीच्या एकमेव उरलेल्या कंटेनर टर्मिनलचे खासगीकरण करण्याचा प्रस्ताव २४ डिसेंबर २०२० रोजी केंद्र सरकारच्या दबावाखाली अगदी पोलिस बंदोबस्तात आणि कामगार विश्वस्त व कामगार संघटनांच्या विरोधानंतरही बहुमताच्या जोरावर मंजूर करण्यात आला होता.त्यानंतर जेएनपीटीच्या कंटेनर टर्मिनलच्या खासगीकरण करण्याच्या प्रक्रियेला वेग घेतला आहे.जेएनपीटीने बंदराच्या खासगीकरणासाठी पीपीपी तत्वावर जागतिक स्तरावर निविदा काढल्या आहेत. यासाठी प्राप्त



झालेल्या १२ निविदांचे मुल्यमापन करण्यासाठी समितीच्या शिफारशींचा प्रस्ताव जेएनपीटीने २३ डिसेंबर २०२१ रोजी बोर्ड ऑफ ट्रस्टीच्या बैठकीत मंजूरीसाठी मांडला होता.

जेएनपीटीच्या कंटेनर टर्मिनलसाठी मागविण्यात आलेल्या १२ निविदांचे मुल्यमापन करण्याच्या प्रस्तावावर ट्रस्टींना ई-मेलव्दारे आपले मत नोंदविण्याचे सांगण्यात आले होते.या निविदांच्या मुल्यमापन प्रस्तावावर १३ पैकी सात ट्रस्टींनी मंजुरी दिली.मात्र कामगार ट्रस्टी भुषण पाटील यांनी यावेळी मतदान प्रक्रियेत मंजुरी अथवा विरोध याबाबत कोणतेही मत न नोंदवता तटस्थाची भुमिका बजावली. यामुळे मात्र त्यांच्या संघटनेच्या कामगारांमध्येच संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यानंतर केंद्र सरकारच्या श्रम आयुक्तांना ३ जानेवारी २०२२ रोजी पाठविण्यात आलेल्या मागणी पत्रात त्यांनी जेएनपीटी बंदराच्या कंटेनर टर्मिनलचे खासगीकरण झाल्यात जमा आहे.

यशस्वी निविदाधारकाला येत्या सहा महिन्यांत चालविण्यासाठीही दिले जाणार आहे.मात्र बंदरात काम करीत असलेल्या १३०० कामगारांच्या नोकऱ्यांवर भविष्यात गदा येणार नाही याची हमी दिली जावी, खासगीकरणानंतर जेएनपीटी बंदरातच कामगारांची काम देण्यात यावे आदी मागण्याही न्हावा-शेवा बंदर कामगार संघटना (अंतर्गत) संघटनेच्या माध्यमातून भुषण पाटील यांनी केल्या आहेत. मात्र भुषण पाटील यांच्या वारंवार बदलत्या भुमिकेमुळे कामगारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. जेएनपीटी कंटेनर टर्मिनल पीपीपी पद्धतीने चालविले जाणार असे गृहीत धरून आणि मान्य करून जेएनपीटीचे विश्वस्त भूषण पाटील आता इतर प्रश्नांकडे वळल्याचे दिसून येत आहे. परंतु पीपीपीच्या विविध प्रश्नांवर कामगारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण करण्यासाठी बिनबुडाची टीका करण्याचे काम ते नेहमीच करताना दिसतात. त्यांनी केंद्र सरकारच्या श्रम आयुक्तांकडे धाव घेतली असून पीपीपी झाल्यानंतरच्या प्रश्नावर करार केला जावा अशी मागणी केली आहे. ही दुटप्पीपणाची भुमिका असल्याची खरमरीत टीका जेएनपीटी कामगारांकडून केली जात आहे.

तर जेएनपीटीच्या कंटेनर टर्मिनलसाठी मागविण्यात आलेल्या १२ निविदांचे मुल्यमापन करण्याच्या प्रस्तावावर ट्रस्टींना ई-मेलव्दारे आपले मत नोंदविण्याचे सांगण्यात आले होते.मात्र मतदान प्रक्रियेत मंजुरी अथवा विरोध याबाबत कोणतेही मत न नोंदवता तटस्थाची भुमिका बजावली.त्यामुळे तटस्थांची भुमिका बजाणारे भुषण पाटील पीपीपीच्या बाजुनेच असल्याची टीका कामगारांकडून केली जात आहे.तसेच याआधीही जेएनपीटी कामगारांना काम करण्यासाठी वाढवण बंदरात पाठविण्याची मागणीही केल्याचा आरोप कामगारांकडून केला जात आहे. जेएनपीटीच्या कंटेनर टर्मिनलच्या खासगीकरण करण्याच्या प्रक्रियेने आता वेग घेतला आहे. संघर्षाचा पवित्रा घेतलेल्या आणि केंद्र सरकारच्या कामगार विरोधी धोरणाविरोधात संघर्ष करणाऱ्या कामगार संघटनेचे नेतेही जेएनपीटी प्रशासनासमोर हतबल झाले आहेत. त्यामुळे कामगारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.कामगारांच्या आरोपांबाबत मात्र संपर्क साधुनही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे त्यांची प्रतिक्रिया समजू शकलेली नाही.

## पेण पत्रकारांच्या वतीने पत्रकार दिन साजरा

**दै.रायगड नगरी । पेण**

मराठी पत्रकारितेचे पितामह तथा जेष्ठ दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त आज सर्वत्र पत्रकार दिन साजरा करण्यात येत आहे. या पत्रकार दिनाचे औचित्य साधून आज पेणमधील पत्रकारांनी देखील पत्रकार दिन साजरा केला. यावेळी या कार्यक्रमाला अध्यक्ष लाभलेले जेष्ठ पत्रकार बाळ सिंगासने यांनी उपस्थित पत्रकारांना संबोधित करताना लेखणी हा खऱ्या अर्थाने पत्रकारांचा आत्मा आहे असे सांगितले.

या कार्यक्रमास जेष्ठ पत्रकार बाळ सिंगासने, पेण प्रेस क्लबचे अध्यक्ष देवा पेरवी, सुनिल पाटील, कमलेश ठाकूर, दीपक लोके, प्रदीप मोकल, स्वप्नील पाटील, नरेश पवार, राजेश कांबळे, संतोष पाटील, गणेश पाटील, प्रशांत पोतदार, किरण बांधणकर, राजेश प्रधान, सूर्यकांत पाटील आदी पत्रकार उपस्थित होते. जेष्ठ पत्रकार बाळ सिंगासने यांनी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्याबद्दल बोलताना सांगितले की, जांभेकरांचे कार्यक्षेत्र अफाट होते. त्यांनी समाजाच्या विविध अंगातून सांस्कृतिक, शैक्षणिक, महिलांविषयी लेखणीतून वेगळा प्रभाव निर्माण केला होता आणि तत्कालीन समाजावर त्याचा प्रभाव होता, म्हणूनच त्यांनी रोव-लेला पाया वर्षानुवर्षे आजही मजबूत आहे असे सांगितले. तर आत्ताच्या पत्रकारांना विशेष करून ग्रामीण भागातील पत्रकारांना शासनाचे संरक्षण देण्याची उपाययोजना करावी अशी विनंती त्यांनी शासनाकडे केली. यावेळी पत्रकारांनी कोरोना काळात घडलेल्या अनुभवांबाबत एकमेकांशी चर्चा केली आणि पत्रकार क्षेत्रात दिवसेंदिवस घडणारे बदल, सोशल मीडियामुळे आपल्या जाहिरातींवर झालेले परिणाम आदी गोष्टींवर चर्चा करून भविष्यात आपली पत्रकारिता भक्कमपणे टिकून कशी राहील याची बांधणी करण्यात आली. तसेच आगामी येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबतही चर्चा करण्यात आली.



## पाली नगरपंचायत निवडणूकीत १७ उमेदवार रिंगणात

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

पाली नगरपंचायत निवडणुकीत ४ प्रभागांतील चार जागांसाठी सोमवारी (ता.३) सायंकाळ पर्यंत २८ नामनिर्देशन पत्र दाखल झाले होते. मंगळवारी (ता.४) झालेल्या छाननीत यातील ८ नामनिर्देशनपत्र बाद झाले आहेत. तर ३ दुबार निघाले. बुधवारी (ता.५) अशी माहिती तहसीलदार दिलीप रायण्णावार यांनी दिली. आता एकूण १७ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. त्यामुळे पालीत पुन्हा एकदा राजकीय रणधुमाळी पहावयास मिळणार आहे,

सोमवारी (ता.१०) नामनिर्देशन पत्र मागे घेण्याची अंतिम तारीख आहे. त्यावेळी खऱ्या अर्थाने कोणकोण निवडणूक रिंगणात आहे ते कळेल. ओबीसी आरक्षण रद्द झाल्याने पाली नगरपंचायतच्या प्रभाग क्रमांक २, ५, ८ व १४ या ४ प्रभागांसाठी १८ जानेवारीला निवडणूक होत आहे. प्रभाग क्रमांक २ व १४ साठी सर्वसाधारण महिला आणि प्रभाग क्रमांक ५ आणि ८ साठी सर्वसाधारण खुला असे आरक्षण पडले आहे. ही लढत अटीतटीची होणार असून मोठी चुरस पहायला मिळणार आहे.

## रोहा अष्टमी शहराचा पाणी पुरवठा ३ ते ४ दिवसांत सुरळीत होणार : मुख्याधिकारी

### रोहा सिटीझन फोरमच्या शिष्टमंडळाने घेतली मुख्याधिकारी गोरे यांची भेट

**दै.रायगड नगरी । रोहा**



रोहा अष्टमी शहरावर नुकतीच ६ दिवस पाणीबाणी ओढवली, रोहेकरांना पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहावे लागले. त्याचबरोबर नागरिकांना अद्याप कमी प्रमाणात पाणि उपलब्ध होत होत असल्याने रोहा तालुका सिटीझन फोरमच्या शिष्टमंडळाने आज नगर पालिकेचे मुख्याधिकारी दयानंद गोरे यांची भेट घेऊन पाणि संकटाला जबाबदार असलेल्यांवर कारवाईची मागणी केली. यावेळी रोहा अष्टमी शहराचा पाणिपुरवठा ३ ते ४ दिवसांत सुरुळीत होईल अशी माहिती मुख्याधिकारी गोरे यांनी दिली.

रोहा अष्टमी शहराला १३.५ कोटी रुपये खर्चाची नवीन वाढीव नळपाणी योजना कार्यान्वित झाली. पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्यांचे काम चुकीचे, नियोजन शून्य व दर्जाहीन करण्यात आल्याने जलवाहिन्यांमध्ये वारंवार बिगाड होत असत. तांत्रिक दुरुस्तीसाठी शहराचा पाणीपुरवठा महिन्यातुन दोन दिवस बंद ठेवण्यात येत असे, गेल्या महिन्यात तर ६ दिवस पाणीबाणी ओढवली, पाण्यापासून नागरिकांना वंचित राहावे लागले. शहराचा पाणिपुरवठा सुरू झाला आला असला तरी खूप कमीप्रमाणात नागरिकांना पाणी उपलब्ध होत आहे.

रोहा अष्टमी शहराचा पाणिपुरवठा सुरुळीत कधी होणार ? त्याचबरोबर १३.५ कोटी रुपये खर्चाच्या रोहा शहराच्या वाढीव नळपाणी योजनेत झालेल्या सावळागोंधळा बाबत आज रोहा सिटीझन फोरमच्या शिष्टमंडळाने मुख्याधिकारी गोरे यांची भेट घेतली, यावेळी अध्यक्ष नितिन परब, ॲड. मनोजकुमार शिंदे, निमंत्रक आप्पा देशमुख, ज्येष्ठ उस्मानभाई रोहेकर, महेश सरदार, राजेश काफरे, प्रशांत देशमुख, मिलिंद अष्टीवकर आदी उपस्थित होते. यावेळी शिष्टमंडळाने मुख्याधिकारी दयानंद गोरे यांच्यासोबत विविध विषयांवर चर्चा केली. फोरमच्या वतीने विविध प्रश्न व मागण्यांचे निवेदन त्यांना देण्यात आले, नागरिकांना लवकरात लवकर मुबलक पाणि मिळावे आणि नवीन पाणीपुरवठा योजनेबाबत काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी यावेळी फोरमतर्फे करण्यात आली.

## वाळवटीकरांची तहान भागवण्यासाठी 'स्वदेश' चा पुढाकार

**दै.रायगड नगरी । दिघी**



श्रीवर्धन तालुक्यातील वाळवटी येथील बौद्धवाडी व हरिजनवाडीतील वृद्ध महिलांकडून पिण्याच्या पाण्यासाठी विनवणी केली जात होती. मागील बऱ्याच वर्षापासुन येथे भेडसावणारी पाणी टंचाई आता स्वदेस फौंडेशनच्या माध्यमातून दूर करण्यात आली आहे.

स्वदेश फाउंडेशनच्या वतीने दिनांक ५ जानेवारी रोजी वाळवटी बौद्धवाडी व हरिजनवाडी येथील पाणी प्रकल्प व वाचनालयाचे उद्घघाटन दिनांक ५ जानेवारी रोजी करण्यात आले. उदघाट्नप्रसंगी स्वदेस फौंडेशन संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंगेश वांगे, संचालक राहुल कटारीया, उप संचालक तुषार इनामदार, महाव्यस्थापक प्रसाद पाटील, व्यवस्थपाक प्रदीप चिणके, संतोष जाधव, समन्व्यक मिलिंद आढाव, महेश गोरेगावकर, शुभदा सुतार इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

तालुक्याला खेटून असणाऱ्या या गा-वात पाणीटंचाई समस्या दरवर्षी कायमची बनली होती. स्वदेशकडून हा पाणी प्रकल्प पूर्ण झाल्यामुळे या वाडीला आता वर्षभर मुलबक पाणी पुरवठा होणार आहे. महिल्यांच्या डोक्यावरील हंडा उतरल्याने महिलामध्ये आनंदाचे वातारण आहे. तसेच या गावातील लोकांच्या मदतीने वाचनालयाची निर्मिती करण्यात आली आहे. वाचनालयमध्ये विविध प्रकारची पुस्तके ठेवण्यात आली. गावातील लहान मुलांपासून ते अगदी वयोवृद्ध लोकांच्या ज्ञानात भर पडेल अशा पुस्तकांचा संग्रह करण्यात आला आहे. तसेच रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट पुणे यांच्या सहकार्याने सर्वांना छ -९५ मास्कची वाटप गावामध्ये करण्यात आले.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी मंगेश वांगेसह सर्व पदाधिकाऱ्यांनी शेती प्रकल्पला भेट दिली त्याप्रसंगी गावाची एकी व समाजाप्रती सेवा करण्याची भावना असेल तर नक्की गावाचा विकास होतो. प्रबळ इच्छा शक्तीच्या जोरावर हे सर्व शक्य झाले ते या गावाने आज दाखवून दिले व त्यांचा आदर्श इतर गावाना नक्कीच प्रेरणादायी ठरेल असे ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना सांगितले.

यासाठी स्वदेश ग्राम विकास समितीचे अध्यक्ष समीर वाळवटकर, सु-नील गमरे, गणेश जाधव, राहुल लोखंडे, मेघना येलवे, अश्विनी येलवे, आदिती गोरेगावकर, आकाश गमरे, प्रज्ञा येलवे, श्रेया लोखंडे, रुपाली वाळवटकर तसेच ग्रामस्थ, मुंबई मंडळ, बचत गट यांच्या मेहनतीने पाठपुरावा करण्यात आला असून आदर्श गाव या संकल्पनेच्या द्रुष्टीने वाटचाल सुरु केली आहे.

## शृंखला स्नेहमेळाव्यात शुन्यकचरा नियोजन करणाऱ्यांचा सत्कार

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

श्रृंखलाइट चा स्नेहमेळावा माणगांव येथील झेमसे यांच्या निवास स्थानी संपन्न झाला. यावेळी शृंखला या स्वयंसेवी संस्थेच्या वतिने माणगांव मधिल सलून व्यावसायीक राहूल मोरे यांनी त्यांचे सलुनमध्ये वापरुन खराब झालेली ब्लेड एकत्र साठवून व्यवस्थित पॅक करुन श्रृंखला संकलन केंद्रात पाठविण्याचे काम केले, यासाठी जाणीवेचा हात म्हणुन त्यांचा सत्कार करण्यात आला.

निकिता चौधरी, अस्मिता सारंग यांना 'समारांगिनी' पुरस्कार देऊन तर केतकी धामणकर यांना 'वसुंधरेची लेक' पुरस्कार आणि मांगिरीष तेंडुलकर या विद्यार्थ्यास 'श्रृंखला चॅम्प' पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. श्रृंखलासाठी कचरा संकलनास जागा उपलब्ध करुन देणारे माणगांव मधिल बांधकाम व्यावसायिक अमेय भावे, गजानन महाराज मंदिर ट्रस्टचे अप्पा कुलकर्णी व सौ कुलकर्णी, पत्रकार कुवेसकर यांचाही श्रृंखला भेटवस्तू देऊन समयोचित सत्कार करण्यात आला.

तसेच कार्यक्रम प्रसंगी किचन वेस्ट पासून खतनिर्मिती, फळांच्या सालीपासून बायो एन-झाईम म्हणजेच मल्टीपर्पज क्लिनर ऑरगॅनिक पेस्टी-साईड व फर्टीलायझर कसे तयार करतात, याविषयी संस्थेच्या उज्वला कोळेकर यांनी प्रात्यक्षिक करुन मार्गदर्शन केले. तसेच माणगांव मधिल प्राची झेमसे यांनी प्लास्टिक कचरा नियोजनासाठी श्रृंखला या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून स्वच्छ माणगांव कचरामुक्त माणगांवसाठी आपण कसा हातभार लावु शकतो याचे विवेचन केले. कार्यक्रम प्रसंगी अल्पोपहार देतानाही प्लास्टीकचा वापर कटाक्षाने टाळत केळीच्या पानात नाश्ता दिला हे विशेष.



शुन्य कचरा नियोजन निर्माण होणाऱ्या दैनंदिन कचऱ्यासाठी. जागेवर आपल्या घरातल कचरा व्यवस्थापन जेव्हा आपण करतो तेव्हा आपल्याला नक्कीच एक वेगळा आनंद उपभोगता येतो. तो म्हणजे माझ्या वसुंधरेवर माझ्या कुठल्याही कचऱ्याच्या पाऊलखुणा मी ठेवत नाही, हा आनंद अमुल्य आहे.

महिन्याभरात साठवलेला सुका कचरा शृंखला ड्राय वेस्ट कलेक्शन सेंटरला आणून द्या, शृंखला ॲक्टिव्हेटर च्या मदतीने ओल्या कचऱ्याचे खत बनवा, शृंखलाच्या वेगवेगळ्या कार्यशाळा मधून कचऱ्याचे वेगवेगळे उपयोग व बऱ्याच शाश्वत गोष्टी शिकण्या साठी आमच्या सोबत या,आपला गांव, शहर स्वच्छ बनवा! असे आवाहन सोप्या शब्दात हसतखेळत शृंखलाच्या महाड येथील मार्गदर्शिका ममता मेहता यांनी केले आहे.

## म्हसळा तालुक्यातील १५ ते १८ वयोगटातील मुलांचे लसीकरण सुरू

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा शहरांत न्यू इंग्लीश स्कूल म्हसळा येथे १५ ते १८ वयोगटातील किशोरवयीन मुलांचे लसीकरणा ला सुरुवात झाली आसल्याचे म्हसळा तालुक्याचे प्रभारी गटशिक्षण आधिकारी तथा -इऊज्र राजेश कदम यानी सांगितले. लसीकरण सुरु होताच ८२ किशोर वयीन मुलांचे लसीकरण झाले त्यामध्ये ५२ विद्यार्थिनी व ३० विद्यार्थांचा समावेश होता असे म्हसळा वैयकिय आधिकारी डॉ. प्रियांका दैशमुख यानी सांगितले. म्हसळा तालुक्यातील लसीकरण तीन प्राथमिक आरोग्य केंद्रांचे माध्यमातून होणार आहे, तालुक्यात १५ ते १८ वयोगटा तील किशोरवयीन मुलांची संख्या २१४९ आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र म्हसळा अर्तगत ६ माध्यामिक व उच्च माध्यमिक विद्यालय आहेत. त्यामध्ये किशोरवयीन मुलांची संख्या १४४१, प्राथमिक आरोग्य केंद्र मेंदडी अर्तगत ७ माध्यामिक व उच्च माध्यमिक विद्यालय आहेत त्यामध्ये किशोरवयीन मुलांची संख्या ४३९, प्राथमिक आरोग्य केंद्र खामगाव अर्तगत ८ माध्यामिक व उच्च माध्यमिक विद्यालय आहेत त्यामध्ये किशोरवयीन मुलांची संख्या २६९ आहे.